SYBMM (M) Creative writing Oct. 2012

**MN10AGP**

**TIME : 2 Hrs.** **Marks :60**

सूचना :-

१. सर्व प्रश्न आवश्यक

**प्र.१ पुढील कथा वाचून कथेच्या विविध घटकांच्या आधारे सविस्तर विश्लेषण करा.** (१५)

एका जंगलात सांबरांचा कळप होता. लांब व सुंदर शिंगे असलेले एक सांबर त्यांच्यात होते. ते स्वत:वरच खूष होते. स्वत:ला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजत असे. एकदा सांबर एकटेच पाणी प्यायला तळयावर गेले.पाणाी पिता पिता पाण्यात त्याला आपले प्रतिबिंब दिसले. स्वत:चे रूप पाहून ते सांबर फार खूष झाले.त्याची शिंगे उंच होती. ती वर्तुळाकार होत गेली होती.निमुळती होऊन ती टोकदार झाली होती.त्या शिंगांमुळे ते अधिकच सुंदर दिसत होते.त्याच वेळी सांबराचे लक्ष आपल्या पायांकडे गेले. ते बारीक काटकुळे पाय पाहून ते दु :खी झाले.

इतक्यात त्याला शिकाऱ्याची चाहूल लागली. सांबर पळू लागले. शिकारी पाठलाग करीत होता. सांबर वेगाने पळत होते. त्याला पळायला त्याचे ते काटकुळे बारीक पायच मदत करीत होते. त्याच्या मनात आले,'अरे,आताच काही वेळापूर्वी मी या पायांना नावे ठेवली. पण आता प्राण वाचवायला या पायांनीच मला मदत केली.'

शिकारी सांबराच्या मागे होताच.धावता धावता धावता सांबर एका झुडपात शिरले. पण त्याची ती सुंदर शिंगे एका झुडपात अडकली.शिकारी जवळ आला आणि त्याने सांबरावर गोळी झाडली. खाली कोसळता कोसळता ते म्हणाले,"अरे,रे,ज्या शिंगांना मी आतच नावजले, त्यांनीच माझा घात केला."

**किंवा**

प्र.१ कथेतील विविध घटक सोदाहरण सांून लघुकथेचा औपचारिक आराखडा सांगा. (१५)

प्र.२ 'मन'या विषयावर तुमची स्वत:ची चार ते सहा ओळींची कविता लिहा. (१५)

**किंवा**

**प्र.२ पुढील कविता वाचून त्यातील सूत्र, भाषाशैली, अलंकार, प्रतिकात्मकता, इ. काव्यघटकांच्या आधारे तिचे विश्लेषण करा.** (१५)

पाणी आटलेले
डोळयांतील आता
ग्रीष्म जाता जाता
पेटलेला

भेगाळलेले ओठ
डोहाच्या काठाचे
पाणी ही पाटाचे
दुभंगले

झाडे वेडी झाली
एका - थेंबासाठी

धरणी कंठात
हुंदका - कोरडा
कसा हंबरडा
उसवावा

गहाण ठेवावी
वसुधा नभाशी
पोकळ ढगांशी
वाद नको

प्र.३ प्रश्न क्रमांक .१ मध्ये दिलेल्या कथेचे आकाशवाणीसाठी नाटयात्म पध्दतीने संहिता लेखन करा. (१५)

किंवा

प्र.३ प्रश्न क्रमांक १ मध्ये दिलेल्या कथेचे नाटयात्मपणे पटकथेत रूपांतर करा. (१५)

**प्र.४ पुढीलपैकी कोणत्याही तीन टीपा लिहा.** (१५)

१. इंटरनेट वरील बातम्या
२. समीक्षण
३. बौध्दिक स्वामित्व हक्क
४. नाटकातील नाटयात्मता
५. प्रकाशनातील विविध टप्पे.

******